# प्रेसनोट

जा.क्र. २४ /माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस उप अधिक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक :– १२/०१/२०१८

## '' बालीका विनयभंग गुन्हयात आरोपीस ६ महिणे कारावास व द्रव्यदंडाची शिक्षा''

पोलीस ठाणे लाखांदुर अंतर्गत ग्राम परसोडी (नाग) येथिल पिडित अल्पवयीन बालीका, वय १४ वर्ष हि प्रशांत विद्यालय भागडी येथे शिक्षण घेत असुन दिनांक ७/०१/२०१६ रोजी गावातीलच वर्ग मैत्रिणी सोबत शाळेत जावुन दुपारी २.०० वा. चे सुमारास भागडी ते परसोडी रोडनी पायदळ घरी परत येत असता आरोपी १) निखील बबन लोणारे रा. भागडी, २)सोमेश्वर परमानंद खरोले रा. चिचोली, ३) अजय रविंद्र गोस्वामी रा. मांडळ हे मोटार सायकलने पाठलाग करून समोर मोटार सायकल उभी केली व पिडित मुलीकडे वाईट नजरेने पाहुन 'जानम रूकजा' असे बोलले त्यावर पिडित मुलीने माझे भावास सांगतो म्हणुन धावत पळत आपले मैत्रिणीसह घरी येवुन घडलेली हकीकत पिडितेने आपले वडीलांना सांगीतली व घडलेल्या घटणेसंबंधी पोलीस ठाणे लाखांदुर येथे तोंडी तक्रार दिल्यावरून अप.क्र. ३/१६ कलम ३५४ (ड) (२),३४ भादवि सहकलम ११ (१)(४), १२ बाल लैंगीक अत्याचार संरक्षण अधिनीयम २०१२ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर गुन्हयाचा तपास पोलीस उपनिरीक्षक प्रमोद राउत, पो.स्टे. लाखांदुर यांनी सुरू केला. गुन्हयात तिन्ही आरोपींना अटक करून साक्षपुरावे गोळा केले आणि विशेष सत्र न्यायालय भंडारा येथे तिन्ही आरोपीं विरूध्द आरोप पत्र दाखल केले. सदर आरोपपत्रास के.क्र. ११/१६ अन्यवे सत्र न्यायाधिश यांचे समक्ष सुनावणी करीता ठेवण्यात आले.

सदर गुन्हयाची सुनावणी **मा. जिल्हा प्रमुख व सत्र न्यायाधिश श्री. संजय आ. देशमुख सा.** यांचे समक्ष चालली गुन्हयात सरकार पक्षातर्फे **ॲडव्होकेट श्री. विश्वास तवले, सहा. सरकारी अभियोक्ता**, सत्र न्यायालय भंडारा यांनी योग्य बाजु मांडुन साक्षदार तपासले. आज दिनांक १२.०२.२०१८ रोजी गुन्हयाचे स्वरूप व गंभिरता लक्षात घेवुन आरोपी क्र. १)

निखील बबन लोणारे रा. भागडी, विरूध्द दोषसिध्द झाल्याने कलम ११ (१)(४),१२ बाल लैंगीक अत्याचार संरक्षण अधिनीयम २०१२ अन्वये ६ महिणे कारावास व ५०००/– रूपये दंड, दंड न भरल्यास १ महिणा कारवासाची शिक्षा सुनावण्यात आली. सदर गुन्हयात पोलीस निरीक्षक बन्सोडे यांचे मार्गदर्शनात पो.हवा. सुरेश भलावी, ब.नं. ८६ यांनी पैरवी अधिकारी म्हणुन कामकाज केले.

(पो. नी. एस. आर. तेलुरे )
जिवीशा शाखा
भंडारा
दुरध्वनी क्र.९९२१२५३५४९

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत:** संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.